# प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (लोहमार्ग) न्यायालय, दौंड यांचे न्यायालयात.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६० व २६३ प्रमाणे समरी फौजदारी खटल्याचे विवरण

**सं. फौ. ख. क. २४७९/२०१६.**
**निशाणी : .**

१. गुन्हा घडल्याची तारीख : 22/08/२०१६.

२. फिर्याद दाखल तारीख : 22/08/२०१६.

३. फिर्यादीचे नांव : शफिक शेख आर.पी.एफ. सोलापूर

४. आरोपीचे नांव : संतोष देविदास बोराडे वय 30 वर्षे, रा. अशोक चौक, सोलापूर

५. गुन्हा कलम : कलम १५९ रेल्वे अधिनियम कायदा, १९८९.

**अपराधाचे विवरण –**

दिनांक 22/08/२०१६ रोजी 6:00 वाजता तुम्ही सोलापूर रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे केले व त्यानुसार तुम्ही कलम १५९ रेल्वे अधिनियम १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

**– आरोपीचे प्रतिकथन –**

प्र. १ : तुम्हाला दाखल केलेल्या फिर्यादीची नक्कल प्रत मिळाली काय?
उत्तर : होय.

प्र. २ : तुम्हाला वाचून दाखविलेल्या गुन्हयाचा तपशिल समजला आहे काय?
उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : नाही.

आरोपीची सही........................................

**समक्ष**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : 22/08/२०१६.**

## फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १

मी शपथपूर्वक कथन करतो ते येणेप्रमाणे :

माझे नाव : श्री. सचिनकुमार,

वय : ३५ वर्षे, व्यवसाय : सहा.उप. निरिक्षक, आर.पी.एफ. सोलापूर.

राहण्याचे ठिकाण : सोलापूर.

### सहा. सरकारी वकील गैरहजर, सरतपास फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार स्वत:

१. दिनांक २२/०८/२०१६ रोजी फिर्यादी श्री. शफीक शेख, आर. पी. एफ. सोलापूर यांनी फिर्याद दिली की, त्यांची ड्युटी सोलापूर रेल्वे स्थानकावर होती. त्यावेळेस आरोपीने सोलापूर रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे केले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस पकडून माझेकडे आणले व लेखी फिर्याद दिली. आता मला ती फिर्याद दाखविली असून ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आता निशाणी ३ देण्यात आले. चौकशीअंती आरोपीने सोलापूर रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे केलेचे निष्पन्न झाले. म्हणून मी आरोपीविरुद्ध कलम १५९ रेल्वे अधिनियमानुसार फिर्याद दाखल केली. आरोपी आज रोजी उपस्थित आहे. त्यास मी ओळखतो.

### उलटतपास आरोपीतर्फे स्वत :

२. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे वाहन नो पार्कींग जागेत उभे केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तुम्ही माझे वर खोटी केस केली.

३. फेरतपास नाही.

वाचून दाखविले स्वीकृत,

समक्ष,

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

दिनांक : २२/०८/२०१६

**<u>फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीच जबाब.</u>**

प्रश्न क्र. १ : फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला काय ?
उत्तर : होय

प्रश्न क्र. २ : सचिनकुमार (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.२२/०८/२०१६. रोजी ६:०० वाजता तुम्ही सोलापूर ~~स्टे~~ रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे केले. याबाबत तुम्हांस काय सांगायचे आहे?
उत्तर : हे खोटे आहे.

प्रश्न क्र. ३ : सदर साक्षीदार तुमचेविरूध्द का साक्ष देतात?
उत्तर : मला माहित नाही.

प्रश्न क्र. ४ : तुम्हास स्वत:ला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे का ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ५ : तुम्हास तुमचे बचावाकरीता साक्षीपुरावा दयावयाचा आहे काय ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ६ : सदर खटल्याबाबत तुम्हांस आणखी काही सांगावयाचे आहे काय?
उत्तर : नाही.

**समक्ष,**

आरोपीची सही..................................

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : २२/०८/२०१६.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वरील तपासणी माझ्यासमक्ष ऐकण्यात व घेण्यात आली असून आरोपीने दिलेला जबाब पूर्णपणे व सत्यतेने नोंदला गेलेला आहे.

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : २२/०८/२०१६.**

## -- न्यायनिर्णय --

( पारित दिनांक २२ ऑगस्ट २०१६. )

१) आरोपीवर, सोलापूर रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे केलेचा, आरोप ठेवण्यात आलेला आहे.

२) फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणे --

दिनांक २२/०८/२०१६ रोजी सकाळी ६.०० वाजता दरम्यान आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे केले असताना फिर्यादी श्री. शफीक शेख, आर.पी.एफ., सोलापूर यांना मिळून आला.

३) आरोपाचे विवरण (नि.क्र.३) आरोपीस वाचून दाखविले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

४) माझेसमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणमिमांसासहित निष्कर्ष देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १ आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे केले असल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... होय. |
| २ आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

### का र णमि मां सा

५) मुद्दा क्रमांक १ :--

श्री. अनिलकुमार (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक २२/०८/२०१६ रोजी आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे केले असतांना फिर्यादी श्री. शफीक शेख यांना मिळून आलेने व त्यांच्या चौकशीमध्ये आरोपीने सोलापूर रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे केलेचे निष्पन्न झालेने त्यांनी फिर्यादीची फिर्याद दाखल केली. आरोपीने नो पार्कींग जागेत वाहन उभे केलेचे नाकारले आहे. परंतु त्याने त्याचे वाहनाची मालकी व रेल्वे स्थानकावरील त्याची उपस्थिती नाकारली नाही, त्यामुळे त्याचे वाहन पार्कींग जागेत उभे होते व त्याबाबत त्याचेकडे रितसर पावती होती हे दाखविणेची जबाबदारी त्याचेवर आहे. परंतु त्याने तशी कोणतीही पावती न्यायालयासमोर दाखल केलेली नाही. तसेच फिर्यादी व चौकशी अधिकारी यांना आरोपीस खोटया प्रकरणात गुंतविण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. तसेच फिर्यादी व आरोपीमध्ये कोणत्याही प्रकारचे पूर्ववैमनस्य नाही. त्यामुळे चौकशी अधिकाऱ्याच्या साक्षीवर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण

आरोपीने अभिलेखावर आणलेले नाही. फक्त उटलतपासामध्ये वाहन नो पार्कींगमध्ये उभे केलेचे नाकारणे ही बाब त्याने त्याचे वाहन नो पार्कींग जागेत उभे केलेचे नाकारणे हे ग्राहीत धरण्यास पुरेशी नाही. सबब मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, आरोपीने सोलापूर रेल्वे स्थानकावर पार्कींगचा वापर न करता आपले वाहन नो पार्कींग जागेत उभे करुन कलम १५९ रेल्वे अधिनियमनुसार अपराध केला म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे. आरोपीला शिक्षेबाबत काय सांगायचे आहे यासाठी मी माझा न्यायनिर्णय काही काळासाठी थांबवतो.

सोलापूर येथील दौरा.
दिनांक: २२/०८/२०१६.

( ओ. शि. पाटील )
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड.

६) <u>मुद्दा क्रमांक २:-</u>

आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असून त्याचा हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. त्याचेवर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच तो कुटुंबातील एकटाच कमावता पुरुष आहे. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिद्ध केलेले नाही. सदरील केसमधील कागदपत्र त्याने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिद्ध करीत नाही. गुन्ह्याचे स्वरुप किरकोळ आहे त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझ्या मते आरोपीस दया दाखविणे योग्य वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

आरोपीस, फौजदारी प्रकिया संहिता कलम २५५(२) अन्वये, कलम १५९ रेल्वे अधिनियम १९८९ या अपराधाखाली सिद्ध दोषी ठरविण्यात येत असुन त्याने सदर अपराधासाठी रुपये ५००/-- (एकूण पाचशे रुपये फक्त) दंड भरावा अन्यथा एक दिवसाची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

सोलापूर येथील दौरा.
दिनांक: २२/०८/२०१६.

( ओ. शि. पाटील )
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड.